महाराष्ट्र शासन
## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड
विधी सेवा सदन, जिल्हा न्यायालय परिसर, नगर रोड, बीड . ४३११२२
ईमेल आयडी Email Id:dlsabeed@gmail.com दुरध्वनी कमांक ०२४४२—२२८७६४

# ई — निविदा सूचना

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड येथे ४ लिपीक टंकलेखक व १ शिपाई या पदांची सेवा बाह्य यंत्रणेव्दारे उपलब्ध करून घेण्याकरिता ऑनलाईन ई—निविदा मागविणे आहे. विस्तृत निविदा सूचना व त्या संबंधीच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in व https://districts.ecourts.gov.in/Beed या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत. इच्छूक कंत्राटदारांना आपल्या निविदा दिनांक १८/०२/२०२५ पासून सकाळी १०—०० ते ०४/०३/२०२५ रोजी सायंकाळी १७—०० वाजेपर्यंत या https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावरून सादर करता येतील.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड.

## महाराष्ट्र शासन
## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड

ई–निविदा कार्यप्रणाली निविदा सूचना क्र. ०१/२०२४–२०२५ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड अंतर्गत (दुरध्वनी क्रमांक ०२४४२–२२८७६४ ) येथे दोन वर्षे मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक टंकलेखक व शिपाई ही पदांच्या कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्धतेसाठी ई–निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरुप | शासन निर्णयाप्रमाणे पद संख्या | कामाची अंदाजीत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड | जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांतर्गत कामकाजामध्ये मदत करणे, तसेच वरिष्ठांनी दिलेली कामे करणे या कामांकरीता लिपीक टंकलेखक या पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देणे | पदसंख्या लिपीक टंकलेखक –४ | २८०३५८४/– |
| २ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालया मध्ये कार्यालयाची स्वच्छता करणे, टपाल वाटप करणे तसेच वरिष्ठांनी दिलेली कामे करणे इत्यादी कामाकरीता शिपाई या पदाच्या सेवा बाह्य यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देणे | पदसंख्या शिपाई–१ | ५४००००/– |
| | | | एकूण | ३३४३५८४/– |

टिप : १. सदरची निविदा ही जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड येथील लिपीक टंकलेखक व शिपाई या पदांकरिता एकत्रित समजण्यात यावी.

२. सदरची निविदा भरताना एकत्रित निविदा बयाना रक्कम रू. ५००००/– नेटबँकिंग प्रणालीने भरावयाची आहे.

३. निविदा फी रुपये ३,०००/– नेट बँकिंग प्रणालीने भरावयाची आहे.

**४. ई–निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर कंत्राटदारांनी अपलोड केलेल्या निविदा कागदपत्रांची हार्ड कॉपीची एक प्रत निविदा सादर करावयाच्या अंतिम वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिर्वाय आहे.**

५. निविदेची एकूण रक्कम ३३४३५८४/– (दोन वर्षाच्या जीएसटी करासह व कामगार विमासह)

: निविदेचे वेळापत्रक :

| | |
|---|---|
| निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | १८/०२/२०२५ वेळ सकाळी १०—०० ते ०४/०३/२०२५ वेळ सायंकाळी १७—०० |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व मुळ दस्तऐवज सादर करण्याचा दिनांक | ०५/०३/२०२५ दुपारी ५—३० वाजता |
| निविदापूर्व परिषद/बैठकीची तारीख | २५/०२/२०२५ |
| तांत्रिक निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण इमारत, जिल्हा न्यायालय परिसर, नगर रोड, बीड |
| आर्थिक निविदा उघडयाचा दिनांक | तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविणेत येईल. |

टिप:

१ सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या www.mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा ०२४४२—२२८७६४

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निविदा बयाणा रक्कम online बयाणा पध्दतीने भरणेची आहे. सदर बयाणा रक्कम निविदाधारकाने http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर केवळ ऑनलाईन स्वरूपातच भरावयाची आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. **पात्र निविदाधारकांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरणा करण्यापासून सुट देण्याबाबतचा निर्णय शासकीय नियमांना अनुसरून घेतला याची नोंद घ्यावी.**

४ निविदाधारक आस्थापना ही नोंदणीकृत एकल स्वामीत्व संस्था—प्रोप्रायटरी फर्म/कंपनी/भागीदारी संस्था/सुशिक्षित बेकारांची सहकारी संस्था वा तत्सम एजन्सी असावी आणि नियमित वस्तु व सेवा व इतर करांचा भरणा करणारी असावी.

५. इतर अटी व शर्ती ई—निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. **सदर ई— निविदा कुठल्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.** निविदेशी संबंधित काही न्यायिक वादविवाद उद्भवल्यास त्याचे न्यायिक कार्यक्षेत्र हे बीड जिल्हा न्यायालय राहील.

६. वरिल निविदा http:// mahatendrs.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

७. शासन निर्णय विधी व न्याय विभाग क्रमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का १२ दिनांक २६/२/२०१३, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि–२०१३/प्र.क्र. ११२/१३/वित्तीय सुधारणा–१ दिनांक २/१२/२०१३, उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक काआआ–२०१३/प्र.क्र.२३३/कामगार–८ दिनांक १८/६/२०१४ शासन निर्णय विधी व न्याय विभाग,३ सप्टेंबर,२०१४, विधी व न्याय विभाग दि २७ जानेवारी, २०१५, विधी व न्याय विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का१२ दिनांक ३/२/२०१५, विधी व न्याय विभाग दि.२३ फेब्रुवारी २०१७ विधी व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट,२०१७ शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट,२०१६ व शासन निर्णय क्रमांक–पदनि–२०२२/प्र.क्र १५/आ.पु.क दि.२७ एप्रिल,२०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे.

P C Yawal
16/01/23

अध्यक्ष
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड

## अटी व शर्ती

बयाना रक्कम (Earnest Money Deposit)- (Technical Bid envelop)

खालील नमुद केलेल्या बाबीची पुर्तता निविदाकराकडून न झाल्यास सदर निविदाकाराची बयाना रक्कम जप्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

अ. निविदा स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे

ब करारावर सही न करणे

क निविदा किंवा प्रस्ताव स्वीकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे

ड निविदा दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापुर्वी कोणत्याही अन्य अटीची पुर्तता न करणे

विविध शासकीय नियमांनुसार जर निविदाधारकांस बयाना रक्कम भरण्यापासून सूट लागू होत असेल तर सुयोग्य पुराव्यासह सादर केलेल्या संस्थांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरणा करण्यापासून नियमानुसार सुट देण्यात येईल. सुट मिळण्याबाबतचा सुयोग्य पुरावा सादर न करता सादर करण्यात आलेल्या निविदांचा प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

**अनामत रक्कम**

यशस्वी निविदाकाराला निविदा रक्कमेच्या ३ टक्के अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी / धनाकर्ष सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे नावे असलेला जमा करावा लागेल.

निविदा प्रक्रिया

संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन ई–निविदा असुन ती तांत्रीक निविदा लखोटा (Technical Bid Envelop ) व आर्थिक निविदा लखोटा (Financial Bid Envelop) अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.

अ) तांत्रिक निविदा

१ निविदा अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा शासकीय नियमाप्रमाणे केला असणे आवश्यक (Tender Form Fee & E.M.D ) – सुट असल्यास त्याबाबतचा पुरावा जोडणे आवश्यक राहील.

२. एकल स्वामीत्व संस्था–प्रोप्रायटरी फर्म/कंपनी/एलएलपी/भागीदारी संस्था/सुशिक्षित बेकारांची सहकारी संस्था वा तत्सम एजन्सीचे नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate)

३. पॅन कार्ड (Pan Card)

४. मागील तीन वर्षाचे आयकार प्रमाणपत्र व ताळेबंद उदा. २०२१–२०२२ ते २०२३–२०२४

५. व्यवसाय कर (Professional Tax) प्रमाणपत्र

६. वस्तु व सेवा कर (GST Registration )प्रमाणपत्र

७. निविदाधारकाने लिपीक टंकलेखंक व शिपाई यांची सेवा केंद्र शासन/महाराष्ट्र शासन या इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाने जारी केलेले कार्यदिश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे (Experience Certificate)

८. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Employees Provident Fund ) नोंदणी प्रमाणपत्र

९ राज्य कर्मचारी बिमा निगम (Employees State Insurance Scheme ) नोंदणी प्रमाणपत्र

१०. कामगार परवाना (Labour Licenses ) नोंदणी प्रमाणपत्र

११. निविदा अटी व शर्तीवर निविदाकराची सही व शिक्का

तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावेत. तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती तांत्रिक पडताळणीकरिता सादर करण्यात याव्यात. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रकियेतून बाद ठरविण्यात येईल.

१२. शैक्षणिक पात्रता— लिपीक टंकलेखक— या पदाकरिता शैक्षणिक पात्रता पुढीलप्रमाणे राहील.

१. कोणत्याही शाखेचा अधिकृत विदयापीठातून उत्तीर्ण झालेला पदवीधर.

ii) must have passed Government Commercial Examination or Examination conducted by Government Board or Government Certificate in Computer Typing Basic Course (GCC-TBC) or I.T.I. for a) English Typing with speed of 40 w.p.m. and b) Marathi Typing with speed of 30 w.p.m.

iii) must possess Computer certificate about proficiency in operation of word processors in Windows and Linux in addition to M.S. Office,

M.S. Word,

Wordstar-7 and Open Office Org. obtained from any of the following Institutes:

a) Universities established under the Maharashtra Universities Act,1994; b)Goa/Maharashtra State Board of Technical Education; c)NIC; d)DOEACC; e)APTECH; f)NIIT; g)C-DAC; h)DATAPRO; i)SSI; j)BOSTON; k)CEDIT; l)MS-CIT by MKCL.

१३. कामाचे स्वरूप (लिपीक टंकलेखक पदासाठी)

१. आवक—जावक नोंदवही संबंधित कामकाज

२. पोस्टल स्टॅम्पसंबंधित कामकाज पाहणे व लेखाजोखा ठेवणे

३. भारतीय डाक विभागाकडून किंवा कुरियरकडून पाठविण्यात आलेले वेगवेगळे टपाल आणि वस्तू व हजेरीपत्रकाशी संबंधित सर्व कामकाज करणे.

४. सर्व प्रकारच्या नोंदवहया लिहिणे, हाताळणे तयार करणे व त्या संबंधीत सर्व कामकाज पाहणे.

५. सर्व प्रकारचे मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक माहिती व विवरणपत्रे हस्तगत करणे, तयार करणे, एकत्रित करणे, तसेच सांख्यिकी विवरणपत्रे तयार करणे आणि या सर्व बाबतीत वेगवेगळे शासकीय कार्यालय, मा.महा.राज्य विधीसेवा प्राधिकरण, मुंबई, मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा.जिल्हा न्यायालय, बीड व इतर तालुका विधीसेवा समिती यांना वेळोवेळी विहित कालावधीत पाठविणे.

६. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिका—यांनी सोपविलेली इतर कोणतेही कामकाज.

१४. शिपाई पदासाठी शैक्षणिक पात्रता

१. शिपाई पदासाठीचा उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

१५. कामाचे स्वरूप

(१) लिपिक–टंकलेखक–आवक आणि जावक नोंदणी ठेवणेसाठी, पोस्टल स्टॅम्पचा हिशोब ठेवणे, भारतीय टपालविभाग व कुरिअरव्दारे पाठविलेली टपाल, विविध साहित्य, हजेरीपत्रके यांचे वितरणकरणे, विविध रजिस्टरलिहिणे आणि हाताळणे. मासिक, त्रैमासिकमाहिती, सांख्यिकीय माहिती प्राप्त करणे व ती एकत्रित करुन सदर अहवाल राष्ट्रिय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकरण, माननीय उच्चन्यायालय व महाराष्ट्र राज्य शासन यांच्याकडे पाठविणेण महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबईच्या अधिकारी / वरिष्ठ यांनी नियुक्त केलेले इतर कोणतेही काम.

(२) शिपाई–फर्निचर आणि यंत्रसामग्री सह संपूर्ण कार्यालयाचा (कचरा आणि धुळसाफ करणे). कागदपत्रे, कागदाचीपुस्तके, तसेच पार्सल बाईडिंग करणे. विविध विभाग आणि कार्यालयांना पत्रे/पार्सल वितरीत करणे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे अधिकारी/वरिष्ठ तसेच कर्मचारी यांनी नियुक्त केलेले इतर कोणतेही काम.

सर्वप्रथम तांत्रिक निविदा उघडण्यात येईल. तांत्रिक निविदा उघडताना निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर राहू शकतात. जर निविदाकार तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पूर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकाराची आर्थिक निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. पात्र ठरणा–या निविदाकारांचीच आर्थिक निविदा उघडण्यात येईल. निविदेमध्ये नमुद केलेली निविदा स्वीकारण्याची व उघडण्याची तारीख पुढील कार्यालयीन दिवस व नियोजित वेळेस राहील, आर्थिक निविदेमधील रक्कम तांत्रिक निविदेमध्ये नमुद करण्यात येवू नये. जर तसे आढळल्यास संबंधीत निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

अ) आर्थिक निविदा

१. निविदेचे दर हे दरपत्रक (Bill of Quantities – BOQ) यामध्ये सर्व करासहीत नमुद करावेत.

२. आर्थिक निविदेमध्ये निविदाकाराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राह्य घरण्यात येईल

३. निविदा स्विकारण्याचा आधिकार या कामासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीला असतील व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा आधिकार सदर समितीला असेल.

क) सर्वसाधारण अटी व शर्ती

१. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले,तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. ज्या कंत्राटदाराने त्याच्या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार : कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा मंडळ योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान + कामगार कल्याण मंडळाकडे जमा करावयाची रक्कम इत्यादी मिळून होणारी रक्कम व कामगार कायद्यातील इतर तरतुदीनुसार देय रक्कम यापेक्षा कमी नमुद असल्यास अशा कंत्राटदाराची निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

३. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने केवळ ऑनलाईन त्ज्ळै ध् छम्थ्ज् द्वारेच अदा करावेत

४. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची छायांकित प्रत, सदर धनादेश स्विकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर RTGS / NEFT चे तपशील लिहीलेले असतील), कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयास सादर करावे लागतील. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत कंत्राटदारास त्या महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

५. कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

६. किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीचे दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगारांच्या सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

७. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देतांना त्यादिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नेये म्हणून दुस—या कामगाराची सोय करण्याची सुपुर्ण जबाबदारी कंत्रााटदाराची असेल.

८. शासकीय कामाचे वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीन भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

९. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी लिपीक टंकलेखक व शिपाई यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन,इतर सवलती च सेवा शर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

१०. ज्या आस्थापनेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार या कार्यालयासोबत रितसर करार करणे आवश्यक राहील.

११. आस्थापनेत काम करणा—या कर्मचा—यांचे सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा कार्यालयावर राहणार नाही.

१२. सदरील निविदा शासनाकडून प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतरच ती अंमलात येईल.

१३. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा—या सेवा/सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे कोटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.

१४. न्यायालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा—या सोई—सुविधा/यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्याअनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१५. कंत्राटदार आस्थापनेने कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देताना, शासन निर्णय विधी व न्याय विभाग क्रमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का १२

दिनांक २६/२/२०१३, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि—२०१३/प्र.क्र. ११२/१३/वित्तीय सुधारणा—१ दिनांक २/१२/२०१३, उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक काआआ—२०१३/प्र.क्र.२३३/कामगार—८ दिनांक १८/६/२०१४ शासन निर्णय विधी व न्याय विभाग,३ सप्टेंबर,२०१४, विधी व न्याय विभाग दि २७ जानेवारी, २०१५, विधी व न्याय विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का१२ दिनांक ३/२/२०१५, विधी व न्याय विभाग दि.२३ फेब्रुवारी २०१७ विधी व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट,२०१७ शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट,२०१६ व शासन निर्णय क्रमांक—पदनि—२०२२/प्र.क्र १५/आ.पु.क दि.२७ एप्रिल,२०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे. या मधील निर्देशांचे कोटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच भविष्यात वेळोवेळी शासनाकडून निर्गमीत होणारे शासन निर्णय बंधनकारक राहतील. सदर शासन निर्णय शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१६. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे, त्यांना नियमित कर्मचा—यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचा—याप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनज्ञेय/लागू राहणार नाहीत.

त्यांचा सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकरणे जबाबदार राहणार नाही.

१७. नियुक्ती प्राधिका—याने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरुप बदलल्यास त्याप्रमाणे कंत्राटदार आस्थापनेने कामे करुन देणेचे त्यांचेवर बंधनकारक राहिल.

१८. कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरविताना त्यात बाल कामगारांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१९. कंत्राटी कामगारास मा. न्यायिक अधिकारी, अधीक्षक, वरिष्ठ लिपीक व न्यायिक कर्मचारी यांनी सांगितलेली न्यायालयीन व इतर सर्व कामे विना तक्रार पार पाडावी लागतील. वेळ प्रसंगी व कार्यक्रमाच्या वेळी कार्यालयीन वेळेनंतर देखील काम पार पाडणे आवश्यक राहील.

२०. कंत्राटदारास निविदा भरतेवेळी आवश्यक ती बयाना रक्कम शासकीय नियमाप्रमाणे जमा करावी लागेल.

२१. कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे तांत्रिक निविदेतील सर्व कागदपत्राची साक्षांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रे न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

२२. कामाचा मोबदला अदा करताना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापून घेण्यात येईल .

२३. कार्यालयात काम करताना कामगारांच्या नजरेस ज्या काही बाबी येतील, त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे, तसेच न्यायालयीन कामात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, याबाबी बंधनकारक राहतील. तसेच न्यायालयातील प्रलंबित / निकाली प्रकरणांबाबत कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीला माहिती सांगणार नाहीत. या बाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२४. कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान झालयाचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रक्कमेतून वसुल करणेत येईल.

२५. कंत्राटदाराने नेमणुक केलेले कामगार हे सर्व एकसारख्या गणवेषात राहतील. सदरील गणवेषाची जिम्मेदारी कंत्राटदार / कामगारांवर राहील. कार्यालयामार्फत गणवेष पुरविले जाणार नाहीत.

२६. केवळ ई —निविदा भरली म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

२७. **ई—निविदा पोर्टलवर 'Bid Lock' झाल्यानंतर निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीची 'Hard Copy' एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिर्वाय आहे.**

२८. कंत्राटदाराने प्रकर्ता (Principal) या नात्याने कंत्राटी कामाचा विमा, (उदा. कंत्राटदाराच्या सर्वकष जोखमीचे विमापत्र, उभारणी / साठवणूक सर्वकष विमापत्र इ.) विमापत्राखाली कंत्राटी कामाच्या संपूर्ण रकमेस व कंत्राटी कामाच्या पूर्ण कालावधीचा विमा हा शासनाच्या विमा संचलनालयाकडे उतरविण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

तसेच कंत्राटी काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांचा श्रमिक नुकसान भरपाई विमापत्राखाली विमा उतरविण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

अध्यक्ष
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड

# निविदा नमुना

निविदा मागविणा—या कार्यालयाचे नाव : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड

| | |
|---|---|
| कामाचे स्वरुप | : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड येथे दोन वर्षे मुदतीच्या कालावधीकरीता ४ लिपीक व टंकलेखक व १ शिपाई यांची सेवा बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेणे बाबत. (सदर कामाची सविस्तर माहिती/अटी व शर्ती तसेच कामाचे स्वरुप दर्शविणारे विवरणत्र सोबत जोडले आहे.) |
| ई—निविदा क्रमांक | District Legal Services Authority, Beed A-1/2024-2025 |

कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचे नाव :

कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता :

कंत्राटदार संस्थेची /कंपनीचा संपर्क दुरध्वनी :

कंत्राटदार संस्थेचा /कंपनीचा नोंदणी क्रमांक :

कंत्राटदार संस्थेचा /कंपनीचा सेवा कर क्रमांक :

कंत्राटदार/ संस्थेने पुढील तक्त्याप्रमाणे माहिती भरुन द्यावी

| अ.क्र | न्यायालयाचे नाव | पदसंख्या | कंत्राटी सेवा पुरविणेसाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकून रक्कम (१ वर्षाकरिता खर्च रुपये ) | साधनसामग्री खर्च असल्यास रूपये वार्षिक खर्च | जी.एस.टी (१ वर्षाकरिता खर्च रुपये) | एकुन रक्कम रुपये (स्तंभ ४+५) | एकुन रक्कम रुपये अक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड | लिपीक टंकलेखक पदसंख्या ४ | | | | | |
| २ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड | शिपाई पदसंख्या १ | | | | | |
| | एकुन | | | | | | |

निविदेची दोन वर्षासाठी होणारी रक्कम : रुपये –३३४३५८४/–

(अक्षरी एकूण तेहतीस लाख त्रेचाळीस हजार पाचवे चौ–यांऐशी रुपये फक्त)

(कंत्राटदाराचे नाव, सही, शिक्का, दिनांक)

(अ.क्र.४ ते ८ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे.)

# करारनामा

आज दिनांक    /    /2025 रोजी खालील प्रमाणे करार केला.

करारनामा दिनांक    /    /2025 रोजी, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड (यानंतर पक्ष क. 01 संबोधले जाईल) आणि ---- यशस्वी झालेल्या कंत्राटदाराचे नाव व पत्ता (यापुढे पक्ष क. 02 संबोधले जाईल) यांच्यामध्ये करार करण्यात आला आहे.

ज्याअर्थी अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड हे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे कार्यालयीन कामकाजाकरिता लिपीक टंकलेखक व शिपाई या पदांची बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी तत्त्वावर सेवा उपलब्ध करण्यासाठी दोन वर्षाच्या कामासाठी पक्ष क. 02 यांचेशी ------- कालावधी करिता करार खालील अटी व शर्तीनुसार करत आहेत.

सदर सेवा कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील.

## अटी व भार्ती

1.पक्ष क. 02 हे जिल्हा व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड येथील दैनंदिन कामाकरिता दिनांक    /    /2025 ते    /    /2027 या -------- कालावधीसाठी 06 (पाच) कामगार पुरवतील व त्यांच्या मदतीने दैनंदिन कामे करून घेतील.

2. सदर कामाकरिता पक्ष क. 2 यांना संदर्भीय शासन निर्णयानुसार प्रतिमाह रू.--------/- + वस्तु व सेवा कर (अक्षरी रूपये ------------ + वस्तु व सेवा कर) मोबदला हा एक महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल.

3. पक्ष क. 2 हे उपलब्ध करुन देत असलेल्या कंत्राटी कामगारांच्या सेवांसाठी शासन शासन निर्णय क. पदनि/2512/प्र. क.157, का-12, दिनांक 27-02-2013, 26-02-2013, 06-03-2013, 19-03-2014, 16-07-2014, 27-01-2015, 02-08-2016 व 23-02-2017 या शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत) तसेच या संदर्भात शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या सर्व निर्देशांचे काटेकारेपणे पालन करणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

4. पक्ष क. 2 हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांची नावे, त्यांचा पत्ता, व त्यांचे चारित्र्यविषयक प्रमाणपत्र व त्यांच्या आधार कार्डच्या प्रती या कार्यालयात सादर करतील.

5. कामगारांच्या कामाच्या वेळा पक्ष क. 2 हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील, व सदर कामगारांकडुन काम करून घेण्याची व त्यांच्यावर देखरेख ठेवण्याची व सदर कामगार कार्यालयात पुर्ण वेळ हजर राहतील याची जबाबदारी ते घेतील.

6. कंत्राटी कामगारांची कामे सकाळी 9.30 ते संध्याकाळी 6.30 या वेळात करण्यात यावी. लोक अदालत, जिल्हा न्यायालयाच्या निर्देशानुसार उपक्रम / कार्यक्रम असल्यास तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास त्यांना काम करावे लागेल. याची जबाबदारी पक्ष क. 2 यांचेवर राहील, त्यासाठी त्यांना वेगळा भत्ता किंवा मोबदला दिला जाणार नाही.

8. इमारतीच्या साफसफाई करिता लागणाऱ्या आवश्यक सर्व वस्तु/साधनसामुग्री याबाबतचा खर्च हा पक्ष क. 2 हे करतील.

9. पक्ष क 2 यांनी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम 1948 मधील तरतुदीनुसार वेतन, विशेष भत्ता, घरभाडे भत्ता, ईएसआयसी, भविष्य निर्वाह निधी, इतर भत्ते व सवलती लागू करणे बंधनकारक असेल.

10. पक्ष क्र. 2 यांनी प्राधिकरणाच्या कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निर्दशनास आले तर संबंधीत कंत्राटदार यांचेवर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. पक्ष क्र. 2 यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणुक केलेल्या कामगारांच्या वेतनाबाबतची किंवा सेवा बाबत कोणत्याही तक्रारी ह्या कार्यालयापर्यंत येणार नाहीत याची दखल घ्यावी. काम करताना त्यांना कोणत्याही प्रकारची इजा / दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी पक्ष क्र. 2 यांची राहील. तसेच कंत्राटी कामगारांकडून शासकीय मालमत्तेची हानी किंवा नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

11. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगिक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता, संबंधित कंत्राटी कामगारांच्या नावाने Account Payee Crossed Cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारे) अदा करावेत किंवा RTGS/NEFT द्वारेच त्यांच्या बॅंकेत जमा करावेत.

12. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना दिलेल्या वेतनाच्या / इतर भत्त्यांची RTGS/NEFT द्वारे वेतनाची रक्कम / इतर भत्त्यांची रक्कम कंत्राटी कामगारांच्या बॅंक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बॅंकेचे विवरणपत्र (Statement) आणि कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर कंत्राटी कामगाराचा RTGS/NEFT क्रमांक लिहिलेला असेल) कंत्राटदाराने दरमहा संबंधित कार्यालयात सादर करावे जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे दाखल करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे देयक कंत्राटदारास अदा करण्यात येणार नाही. तसेच सदर कागदपत्राची छांयाकित प्रत पक्ष क्रमांक 1 यांचे कार्यालयास सादर करणे पक्ष क्र.2 यांचेवर बंधनकारक राहील. देयकासोबत उपरोक्त सर्व कागदपत्रे पक्ष क्रमांक 2 हे अधीक्षक, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, केज यांचेकडे त्यांचे फर्मच्या/संस्थेच्या नावाने ------------------------------या नावाने सादर करतील तद्नंतर वित्त व लेखा विभागामार्फत कागदपत्रांची पडताळणी करुन सादर करण्यात आलेली कागदपत्रे अट क्रं. 12 नुसार योग्य असल्याबाबत खात्री करुन त्यांचे अभिप्रायासह सदरचे कागदपत्रे जिल्हा म्हणजेच न्यायालयाचे लेखा विभागातील देयक लिपीक यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित करतील.

13. किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार पक्ष क्र. 2 यांनी कंत्राटी कामगारास भरपगारी साप्ताहीक सुटी देणे बंधनकारक आहे व ती साप्ताहीक सुटी त्यांना रविवारी देण्यात यावी. अशा सुटीच्या दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगाराच्या सेवेची आवश्यकता भासल्यास, त्याचेऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी पक्ष क्र. 2 यांची असेल. दुसरा व चौथा शनिवार आणि ज्या दिवशी कार्यालय बंद असेल अशा दिवशी कार्यालयीन कामासाठी कंत्राटी कामगारांना बोलाविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापुन घेण्यात येवु नये. तसेच दुसरा व चौथा शनिवार या दिवशी कार्यालयीन कामांसाठी कंत्राटी कामागारांना बोलावण्यात आले तर त्यास येणे बंधनकारक असेल व त्याचा त्यांना वेगळा मोबदला किंवा मानधन मिळणार नाही.

14. सुटीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देताना त्या दिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवु नये म्हणुन दुसऱ्या कामगारांची व्यवस्था करण्याची संपुर्ण जबाबदारी पक्ष क्र. 2 यांची असेल.

15. पक्ष क्र. 2 यांनी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना जास्तीचे काम करावे लागल्यास, त्यांना अतिकालिक भत्ता (ओव्हरटाईम) देणे पक्ष क्र. 2 यांना बंधनकारक असेल व सदर अतिकालिक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी पक्ष क्र. 2 यांचेवर असेल.

16. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांना कार्यालयात हजर होताना व कार्यालय सोडताना बायोमॅट्रीक्स प्रणालीवर त्यांची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल, सदर नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे. जेथे बायोमॅट्रीक्स प्रणाली उपलब्ध नसेल तेथे स्वतंत्र

हजेरीपटावर कार्यालय कंत्राटी कामगारांची उपस्थिती व कार्यालय सोडल्याबाबतच्या नोंदी ठेवावयाच्या आहेत.

17. पक्ष क. 2 यांनी महिन्याचे देयक सादर करताना त्या महिन्यात त्यांनी नेमलेले कामगार, कार्यालयीन कामकाजाच्या जितके दिवस अनुपस्थित होते व त्यांच्या ऐवजी पक्ष क्रं 2 यांनी बदली कामगार उपलब्ध करुन दिलेले नव्हते त्या कालावधीतील वेतन, देयकातुन वजा करुन देयक सादर करावे व त्यानुसार देयक अदा करण्यात येईल यांची नोद पक्ष क्रं 2 यांनी घ्यावी.

18. पक्ष क. 2 यांनी नेमणुक केलेले कामगार हे सर्व एकसारख्या गणवेशात राहतील. सदरील गणवेषाची जिम्मेदारी कंत्राटदार / कामगारांवर राहील. कार्यालयामार्फत गणवेष पुरविल्या जाणार नाहीत.

19. पक्ष क. 2 यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांच्या वतीने नेमण्यात आलेले कंत्राटी कामगार यांना या कार्यालयाकडे कायमस्वरुपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचे अधिकार राहणार नाहीत. किंवा सदरील कंत्राटी सेवेमुळे भविष्यात नियमीत कर्मचारी म्हणून सेवेत सामावून घेण्यांची मागणी करण्याचा त्यांना कसल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

20. पक्ष क. 2 आणि त्यांचे कामगार हे कार्यालयात काम करताना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणिव ठेवुन त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच कार्यालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही या बाबतची दक्षता घेतील. तसेच न्यायालयातील प्रलंबित / निकाली प्रकरणांबाबत कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीला माहिती सांगणार नाहीत.

21. पक्ष क. 2 त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांकडुन वक्तशीरपणे व नियमितपणे या कार्यालयातील कामे करवुन घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व नशापाणी केलेली केलेली नसावी तसेच त्यांचे उत्तरदायित्व हे या कार्यालयातील सर्व हितसंबंधांची रक्षा करण्याचे राहील.

22. या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सूचना हे पक्ष क. 2 यांच्यावर बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे विहीत केलेल्या गुणवत्तेनुसार ते काम करून घेतील.

23. कंत्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणून काम पाहतील व 1996 च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय अंतिम असेल.

24. पक्ष क. 02 यांच्याकडून नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास पक्ष क. 02 यांना देय असलेल्या रकमेतून सदर रक्कम वसुल करण्यात येईल.

25. पक्ष क. 02 यांना एकूण कंत्राटाच्या रकमेच्या **3** टक्के अनामत रक्कम ही बँक गॅरंटी च्या स्वरूपात दिनांक / /2025 ते / /2025 पर्यंतच्या कालावधी करिता द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास बँक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवा कराराच्या दरम्यान पक्ष क. 02 यांची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस–या एजन्सीकडून पक्ष क. 02 यांच्या जबाबदारीवर व त्यांच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करून घेतले जाईल.